# ऑनलाइन खरेदीत पुणे अव्वल!

म. टा. प्रतिनिधी, पुणे

वेब पोर्टलच्या माध्यमातून पुस्तकांची खरेदी एका क्लिकवर आल्याने वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यास मदत होत आहे. भारतातील मराठी पुस्तकांच्या सर्वाधिक ऑनलाइन खरेदीमध्ये सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेले पुणे आघाडीवर आहे. तर, परदेशात मराठी पुस्तकांच्या खरेदीमध्ये अमेरिकेतील नेटिझन्सचा पहिला क्रमांक लागतो.

ऑनलाइन पुस्तक विक्रीमध्ये आघाडीवर असलेल्या बुक गंगा डॉट कॉम या वेब पोर्टलने केलेल्या पाहणीतून हा निष्कर्ष समोर आला आहे. बुकगंगाने ऑनलाइन खरेदी, ग्रामीण आणि शहरी भागांतील खरेदी, ई-बुक आणि मुद्रित पुस्तके यांचा आढावा घेणारी पाहणी नुकतीच केली. त्यातील निष्कर्षांची माहिती 'बुकगंगा'च्या संचालिका सुप्रिया लिमये यांनी 'मटा'ला दिली.

**'बुकगंगा'च्या पाहणीतील निष्कर्ष; अमेरिकेतील नेटिझन्सचीदेखील आघाडी**

बुकगंगाच्या पोर्टलवरून उपयुक्तता, शैक्षणिक, ललित, स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांची खरेदी केली जाते. पुस्तकांच्या एकूण खरेदीमध्ये वाचकांचा कल ललित साहित्यापेक्षा उपयुक्ततेच्या पुस्तकांकडेच अधिक असल्याचेही स्पष्ट झाले.

भारतातील मराठी पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीमध्ये पहिल्या स्थानी पुणे, दुसऱ्या स्थानी मुंबई, त्यानंतर बंगळुरू, नागपूर, नाशिक, कोल्हापूर या शहरांचा क्रमांक लागतो. अमेरिकेनंतर ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि दुबईमध्ये सर्वाधिक मराठी पुस्तके खरेदी केली जातात. कोसला, आमचा बाप आणि आम्ही, नारायण धारप यांच्या कथा आदी पुस्तके लोकप्रिय आहेत.

'शहरांसह ग्रामीण भागातूनही पुस्तके ऑनलाइन मागवली जातात. ग्रामीण भागात पुस्तकांची दुकाने नसल्याचे कारण त्यामागे आहे. ई-बुकपेक्षा मुद्रित पुस्तकांनाच मागणी जास्त आहे,' असेही लिमये यांनी स्पष्ट केले.

## मराठी ई-बुक वाचकांमध्ये वाढ

ई-बुक विक्रीमध्ये 'न्यूजहंट' हे ॲप्लिकेशन आघाडीवर आहे. या ॲप्लिकेशनवरून नोव्हेंबर २०१३ ते मार्च २०१५ बारा भारतीय भाषांतील एक कोटीपेक्षा अधिक पुस्तके डाउनलोड झाली. त्यातील मराठी ई-बुक वाचणाऱ्यांची संख्या बारा टक्क्यांच्या घरात आहे. स्मार्ट फोनच्या वाढत्या वापरामुळे ई-बुक वाचकांच्या संख्येत चांगल्या रितीने वाढ होत आहे. येत्या काळात एकूण पुस्तकांच्या व्यवहारातील ई-बुकचा वाटा दोन ते तीन टक्क्यांनी वाढणार आहे, असे निरीक्षण 'न्यूजहंट'चे वरिष्ठ अधिकारी रावनन एन यांनी नोंदवले.

## आज जागतिक ग्रंथदिन